# My first step in the world of Blogging

by Narendra Modi 14. April 2009 14:17



मित्रांनो,

आपण सगळ्यांनी केलेल्या स्नेहपूर्वक आग्रहामुळे मी ब्लॉगच्या या दुनियेत पाऊल ठेवत आहे.

आज १४ एप्रिल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची ११८ वी जयंती.

शोषित, पीडीत आणि वंचित वर्गात जन्मलेल्या आणि अनेक संकटांशी झुंज घेत, 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' असा सकारात्मक संदेश देणाऱ्या या महामानवाला माझे कोटी कोटी प्रणाम.

आपण लोकशाही भारताची घटना लिहिणाऱ्या डॉ. आंबेडकरांच्या जयंतीसोबतच, लोकसभा निवडणुकीचा उत्सवही साजरा करत आहोत. जगभरात भारताची ओळख सर्वात मोठा लोकशाही देश या रूपात आहे आणि या लोकशाहीचा सर्वात मोठा उत्सव आहे, निवडणूक. उत्सवाप्रमाणेच निवडणुकीतही विविध रंग असणे स्वाभाविक आहे. प्रत्येक पक्षाचे आणि उमेदवारांचेही स्वतःचे एक लक्ष्य असणेही स्वाभाविक आहे.

पण या देशाचे नागरीक आणि मतदार म्हणून आपले सगळ्यांचे लक्ष्य मात्र एकच असायला हवे- भारत बलवान कसा होईल? भारत आणखी समृद्ध कसा होईल? हे ते लक्ष्य. आमची लोकशाही अधिक मजबूत, परिपक्व व सर्वसमावेशक होण्यासाठी प्रत्येक नागरिकाने आपल्याला नेमून दिलेल्या धर्माचे पालन करणे आवश्यक आहे.

राष्ट्रहिताची भावना मताधिकार असणाऱ्या प्रत्येक नागरिकात असलीच पाहिजे.

मित्रांनो, या ब्लॉगच्या माध्यमातून परस्परांना जाणून घेण्याबरोबरच विविध दृष्टिकोनांवर सर्वसमावेशक चर्चा झाल्यास सामुदायिक मंथन, मनन व चिंतनाचा आनंद मिळेल. हे मूर्त रूपात पाहण्यासाठी सगळ्यांची मदतही मिळेल.

एकांगी विचार सर्वांगी बनतील.
एक वैयक्तिक पाऊल सगळ्यांना मिळून पुढे घेऊन जाणारे ठरेल.
'माझे ते चांगले' या भावनेऐवजी 'चांगले ते माझे' ही भावना तयार होईल.

मित्रांनो, आपण असेच भेटत राहू. वैचारीक आदान प्रदान करत राहू. आज फक्त एवढेच.

आपला



Copyright © 2009 NarendraModi.com